# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १०.१.२००६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.२१) इतिवृत्त**

मंगळवार दिनांक १० जनेवारी २००६ रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.काशीनाथ कोकाटे** यांचे अध्यक्षतेखाली ''मलिक अंबर स्थायी समिती सभागृह '' येथे दुपारी ५.०० वाजता ''वंदे मातरम्'' या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

(०१) श्री. साहेबराव राणुबा कावडे
(०२) सौ. खंदारे वंदना प्रकाश
(०३) श्री. गवळी रविकान्त काशीनाथ
(०४) सौ. जधव संगिता विठ्ठलराव
(०५) सौ. दलाल लता श्रीनिवास
(०६) श्री. दाभाडे मिलींद यशवंत
(०७) श्री. दिलीप नारायण गायकवाड
(०८) श्री.नासेर मो. नाहदी
(०९) श्री. पांडे विनायक प्रभाकर
(१०) श्री. बारवाल गजनन रामकिशन
(११) श्री. बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
(१२) श्री.मुजीब आलमशाह खान
(१३) श्री. विसपुते शशांक दामोधर
(१४) श्री. वैद्य रेणूकादास दत्तोपंत

**विषय क्र.१६६ :**

सन १९९९-२००० च्या लेखा परीक्षण अहवालावर विचार विनिमय करणे.

**संवाद :**

मा.सभापती : लेखा परीक्षण अहवाल संबधी मुख्यलेखा परीक्षक यांनी सविस्तर माहिती दयावी.

मा.आयुक्त : लेखा परीक्षण अहवाल जे पर्यत स्थायी समितीची मान्यता होत नाही तोपर्यत सर्वसाधारण सभेची मान्यता होणार नाही. त्यानंतरच लिगली कार्यवाही करता येईल.

मुख्यलेखा परीक्षक : सन १९९९-२०००,२०००-२००१,आणि २००१-२००२ पर्यतच्या दिलेल्या लेखा परीक्षण अहवालावर चर्चा करण्यासाठी स्थायी समितीचे आयोजन करण्यात आलेले आहे. लेखा परीक्षण विभाग हा महानगरपालिकेत स्वतंत्र विभाग अस्तित्वात असून स्थायी समितीच्या अंतर्गत येतो. दर वर्षाचा लेखा परीक्षण अहवाल हा तयार करून स्थायी समितीला सादर करणे क्रमप्राप्त असते.त्यानूसार अहवाल सादर केलेला आहे. लेखा परीक्षण विभागात सूरूवातीस १९८३मधे फक्त सहा पदे होती.त्यानंतर १९९१-९२ मधे या विभागात काही पदाची वाढ होवून सद्य स्थितीत ९ पदावर कर्मचारी कार्यरत आहे.त्यापैकी मूख्यलेखा परीक्षक एक पद, वरीष्ठ लेखा परीक्षक एक पद, चार कनिष्ठ लेखा परीक्षक असून चार कनिष्ठ लिपीक आहेत.कार्यालयीन

अधिक्षकाचे पद गेल्या पाच वर्षापासून रिक्त आहे.शिपाई यांची संख्या गृहीत धरता एकूण १३ कर्मचाऱ्याचा स्टाफ आहे. १९९१ मधे महानगरपालिकेचे बजेट हे३६ कोटीचे होते. त्यावेळी हा कर्मचारी वर्ग पद संख्या मंजूरी झालेली होती. आणि त्याच कर्मचाऱ्याच्या माध्यमातून सन २००५ पर्यत चे काम करून घेत आहोत. मागिल वर्षाचा विचार केल्यास १३४ कोटीचा खर्च असून त्याच प्रमाणे १३४ कोटीच जमा बाजूअसते या दोन्ही बाजूच्या रक्कमेचा लेखा परीक्षण म्हणजेएकूण २६८ कोटीचे लेखा परीक्षण करावे लागते.बऱ्याच वेळा सथायी समिती सव सर्वसाधारण सभेला लेखा परीक्षण अहवाल देणे अडचणीचे ठरते आहे परंतू जे अहवाल मिळतो आहे तो ठराविक कालावधीतच लेखा परीक्षणाचे काम करीत आहोत. व स्थायी समिती समोर अहवाल सादर करीत असतो. सन९९-२००० या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षण त्याच वर्षात झालेले होते दिनांक १०.५.२००१ मधे सदर वर्षाचे लेखा परीक्षण अहवाल मा. सभापती यांचेकडे दिलेला आहे. सन २०००-२००१ चा लेखा परीक्षण अहवाल दिनांक २९.१२.२००१ रोजी मा. सभापती यांचेकडे दिलेला आहे. सन २००१-२००२ चा अहवाल हा दिनांक २० जूलै २००२ रोजी मा. सभापती यांचेकडे दिलेला आहे लेखा परीक्षणाचा अहवाल वेळोवेळी लेखा परीक्षक विभागाकडून स्थायी समिती म्हणजेच मा. सभापती यांचेकडे वेळोवेळी सादर केलेला आहे. लेखा परीक्षण करतांना काही अडचणी येतात आताच सांगितल्या प्रमाणे कर्मचारी वर्ग अपूरा आहे. जस्तीचा कर्मचारी वर्ग घेण्यासाठी स्थायी समिती व सर्वसाधारण सभेच्या मंजूरीने ३६ पदाची शासनाची मान्यता घेण्यासाठी पाठविण्यात आलेले आहे. त्या पदांना मंजूरी येईल त्यासाठी पाठपूरावा करण्याची आवशकता आहे. कमी कर्मचारी यांचेकडून जस्तीचे काम करून घेणे होत नाही. तरी पण आहे त्याच कर्मचाऱ्याकडून काम करून घेत आहोत. लेखा परीक्षण करतांना एक ठराविक कालावधी निश्चित केला जतो त्यानूंसार कामकाजहोते. संबधीत जेविभाग आहे त्यांना त्या त्या कालावधीच्या संदर्भात पत्र दिले जते व या विभागाचे कर्मचारी लेखा परीक्षणासाठी गेल्यानंतर त्या विभागात कागदपत्राची जमवा जमव सूरू होते. यामधे जस्तीचा कालावधी जतो. ठरलेल्या कालावधीतच त्या विभागाचे लेखा परीक्षण करणे शक्य होत नाही. सर्वच विभाग प्रमूखाकडे अशी परीस्थिती निर्माण होत नाही व जेरेकॉर्ड उपलब्ध करून दिले जते ते पूर्ण नसतात अपूर्ण अवस्थेत असतात. लेखा परीक्षण करण्यासाठी गेलो असता काही रेकॉर्ड मिळत नाही त्यामूळे जे हाफमार्जेन देतो त्यानुसार त्या कागदपत्राची आवश्यकता आहे त्या संबधीची पत्रे देवून सूध्दा उत्तरे मिळत नाही. पर्यायाने अक्षेप नोंदवावे लागतात. सन ९९-२००० मधे एकूण ६२ लेखा परीक्षण अक्षेप नोंद करण्यात आलेले होते. त्यातील आजच्या तारखेला २२ आक्षेप आज मितीला आहेत. तीनही वर्षातील शिल्लक अक्षेप किती आहे ते अहवालाच्या शेवटी दिलेले आहे. यात काही परीच्छेद वगळले असले तरी सभागृहात चर्चा होवू नये असे काही नाही. सभागृहात सविस्तर चर्चा व्हावी वनिर्णय होणे अपेक्षीत आहे व त्यानूसार कार्यवाही होणे आवशक आहे. तिन्ही वर्षाचे गोषवारा दिलेला आहे त्यात ९९-२०००मधील २२ परिच्छेद पेंडींग असलेले दिसून येईल. तसेच सन २००१-

२००२ चे ६१ परीच्छेद पेंडींग आहे. अवलोकन केले असता असे दिसून येईल की, गेल्या शेवटच्या दोन वर्षाच्या परीच्छेद मधील सन २००२ मध्ये ९९ परीच्छेद मधील आणखी ६८ परीच्छेद प्रलंबीत आहे. ३१ परीच्छेदच्या बाबतीत निपटारा झालेले आहे. सन २००१-२००२ चे ५८ परीच्छेद प्रलंबीत आहे. शाखा प्रमूख व विभाग प्रमूख यांचेकडून कंम्लायन्स करण्याची जी गती आहे ती प्रतिसाद नसणारीआहे. ज्या ज्या वेळी लेखा परीक्षणासाठी कर्मचारी जतात त्या त्या वेळी सर्व माहिती त्या त्या विभागातून उपलब्ध झाली पाहिजे हाप मार्जीन दिल्यनंतर त्यांची उत्तरे ही विहित मूदतीत देणे, तिसरा मूद्दा असा की लेखा परीक्षण अहवाल हे कॉम्प्यूटरायीज होणे गरजेचे आहे. याची इंटरनल ऑडीट व्यवस्था महानगरपालिकेच्या अंतर्गत होणे आवशक आहे. यामूळे किती अहवाल पूर्ण झालेले आहे किती प्रलंबीत आहे हे त्या त्या विभागाकडून माहिती घ्यायची म्हटले की मिळणार नाही. कारण याची माहिती कोणत्याही विभागाकडे मिळणार नाही. इंटरनल ऑडीट केले असता कोणत्या वर्षीचे किती परीच्छेद प्रलंबीत आहे हे लगेच कळेल.त्यासाठी इटरनल ऑडीट असावेत.मा. आयुक्तांनी अचानक विभागांना भेटी दिल्या पाहिजे तिन्ही अहवाल हे उशीरा सादर केलेले नसून वेळेवर मा. सभापती यांचेकडे सादर केलेले होते. त्यावर चर्चा होवून आवशक त्या सूचना कराव्यात अशी अपेक्षा आहे.

श्री.मुजेब खान :सन ९९-२००० चे लेखा परीक्षण करतांना कोणकोणत्या विभागाकडून माहिती मिळालेली नाही .

मुख्यलेखा परीक्षक : सन ९९-२००० चे जे स्टेटमेंन्ट दिलेले आहे त्यात शेवटच्या पानावर सर्व नमूद केलेले आहे. ज्या विभागाकडून अनुपालन येणे आहे ते पान क्र ८ वर दिलेले आहे बरेचशे प्रकरण प्रलंबीत आहे.

श्री.मुजेब खान :सन ९९-२००० च्या लेखा परीक्षणातील काही प्रकरणे प्रलंबीत आहे त्याचे कारण काय याचा खूलासा होणे गरजेचे आहे.ही सर्व प्रकरणे निकाली काढली पाहिजेयात १० विभागाची माहिती नाही.

श्री.कवरसिंग बैनाडे :ज्या ज्या विभागाचे लेखा परीक्षणाचे मूद्दे प्रलंबीत आहे त्यासाठी १० ते १५ दिवसाची मूदत दयावी. सर्व क्लिअर होईल.

सौ. लता दलाल : जे लेखा परीक्षण अहवाल सादर झालेला आहे त्यात अनेक विभागाकडून माहिती व प्रकरणाचा तपशिल दिलेला नाही. जी थकबाकी आहे ती जमा झालेली दाखविलेली नाही. सन ९९-२००० चा अहवाल समोर आलेला आहे. आता सन २००६ वर्ष चालू आहे. सन ९९-२००० च्या लेखा परीक्षण अहवालात जी थकबाकी दाखविलेली आहे ती वसूल झालेली आहे की नाही कुठेतरी उल्लेख असावयास पाहिजे होता. या अहवालावर चर्चा केल्यास वेळ वाया जईल असे वाटते. सन २०००-२००१ च्या अहवालात अनेक बाबीची पूर्तता झालेली असेल तसेच मागिल वर्षीची पूर्तता ही सन २००१-२००२ मधे केलेली असेल जी थकबाकी दाखविलेली आहे ती आजपर्यत वसूल झालेली आहे काय? सर्व माहिती समोर यावी त्यानंतरच यावर चर्चा करणे योग्य होईल.प्रत्येक महिण्याला लेखा परीक्षणाचा अहवाल दिला तर त्यानूसार निर्णय घेता येईल.

श्री. कवरसिंग बैनाडे :भविष्यनिर्वाह निधीची रक्कम जस्त गेलेली आहे असे म्हटले काही रक्कम लेखाधिकारी यांनी वसूलही केलेले आहे. उर्वरीत २४,६९९/-रूपये कोणी

भरणा करायचे असा प्रश्न येतो. जस्तीची गेलेली रक्कम का वसूल करण्यात आलेली नाही. किंवा ज्यांनी दिली त्या कर्मचाऱ्याकडून वसूल करावी.

मा.आयुक्त :या तिन्हीही अहवालानूसार थोडासा बदल झालेला असेल स्थायी समितीने काही मूदत द्यावी. ७० ते ८० टक्के मुद्दे/प्रकरणे निकाली निघतीलच.

श्री.रेणूकादास वैद्य :ऑडीटची पध्दत ही दोष दुरूस्ती आहे असे पूस्तकात दिलेले आहे अशी पध्दत असावी. या पूस्तकात फक्त दोषाचा उल्लेख होता.दोष दुरूस्त्या काय केलेल्या आहे त्याची माहिती आज आमच्याकडे आलेली आहे. या सर्व बाबीवर चर्चा करणे कमी वेळात होणार नाही. कुठले अनूपालन झाले कुठले दोष निघालेले आहे याची सविस्तर माहिती समोर आली पाहिजे नूसती चर्चा करून अर्थ नाही. १३१ दोष असतील त्यापैकी किती प्रकरणावर दुरूस्त्या झालेल्या आहेत. काही समाधानकारक दुरूस्त्या झालेल्या असतील तो भाग वेगळा आहे. ज्या दोषावर दुरूस्ती करण्या संदर्भात खूलासा मिळाला नाही तर काय कार्यवाही करणार आहे. उत्तर मिळत असेल तर चर्चा करावी.

श्री.रेणूकादास वैद्य :दोन महिण्यानंतर बैठक ठेवावी. दुरूस्त्या समोर येतील. कार्यवाही करता येईल.

श्री.मुजेब खान : अनेक विभागाची माहिती आलेली नाही असे मुख्यलेखा परीक्षक यांनी आताच म्हटले आहे. सन ९९-२००० च्या लेखा परीक्षणानूसार कुणाकडे किती रक्क्म आहे व ती वसूल करावयाची आहे. हे संपूर्ण क्लिअर झाल्यानंतर यासाठी वेळ दयावा संपूर्ण अभ्यास करून यावर निर्णय घेता येईल.

मा.सभापती : या अहवाला संदर्भात स. सदस्यांच्या काही त्रृट्या निदर्शनास आलेल्या आहेत. सर्व सदस्यांचे एकमत झाले की सन ९९-२००० च्या लेखा परीक्षण अहवाल मंजूरी देण्याचे काम बाकी आहे. या संपूर्ण बाबीचे प्रत्येक वर्षात बघीतले तर अनेक तृटी दिलेल्या आहे. सन ९९-२००० मधील २२ प्रकरणे प्रलबीत आहे संबधीत विभागाने अनुपालन करणे गरजेचे आहे. परंतू आजपर्यंत ते केलेले नाही. यातील अनुपालन हे पूढील वर्षात केलेले असेल .कमी जस्त प्रमाणात होवू शकते. आताच संबधीत अधिकारी यांनी सांगितले की सहकार्य मिळत नाही. ज्या ज्या त्रृटी राहिलेल्या असतील त्या मुख्यलेखा परीक्षक यांनी ठराविक कालावधीत निराकरण करणे हे त्याचे कर्तव्य आहे असी सूचना करण्यात येते. ज्या विभाग प्रमूखाकडून लेखा परीक्षणासाठी माहिती देण्याचे काम होणार नाही त्यांचेवर कार्यवाही होईल. संपूर्ण कार्यवाही झाली असती तर जेभूखंड घोटाळा प्रकरण चालू आहे ते झाले नसते. वेळीच लेखा परीक्षण न झाल्यामूळे हया सर्व बाबी घडत आहे. सर्व विभाग प्रमूखांना सूचना करण्यात येते की सन ९९ ते २००४ पर्यंतचे वार्षिक अहवाल सर्वांना दिलेले आहे. राहिले असेल तर स. सदस्यांना देण्यात याव्यात अशी सचिव यांना सूचना करतो. लेखा परीक्षण करण्यासाठी विभाग प्रमूखांनी माहिती दिली नाही तर मा.आयुक्त यानी, मुख्यलेखा परीक्षक यांनी लेखी तक्रार केल्यानंतर त्या विभाग प्रमुखांवर त्वरीत कार्यवाही करावी. चार वर्षाच्या लेखा परीक्षण अहवालामधे ज्या त्रृट्या राहिलेल्या आहे त्या संबधी सर्व विभाग प्रमूख यांनी त्यांचेकडे मागविलेली माहिती ही वेळीच मुख्य लेखा परीक्षक यांना दयावी. व मुख्य लेखा परीक्षक यांनी चार ही

वर्षाचा लेखा परीक्षण अहवाल सादर करावा. दिनांक २८ फेब्रुवारी २००६ रोजे या अहवालावर चर्चा करण्यासाठी बैठक आयोजित केली जईल.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सन १९९९-२००० च्या लेखा परीक्षण अहवालातील आक्षेपांची पुर्तता करण्याकरीता प्रशासनास २८ फेब्रुवारी पर्यंत मुदत देण्यात येते. प्रशासनाने अनुपालन करून अहवाल सादर करावा. त्यावर विचार विनिमय करण्यात येईल असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.१६७ :**

सन २०००-२००१ च्या लेखा परीक्षण अहवालावर विचार विनिमय करणे.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सन २०००-२००१ च्या लेखा परीक्षण अहवालातील आक्षेपांची पुर्तता करण्याकरीता प्रशासनास २८ फेब्रुवारी पर्यंत मुदत देण्यात येते. प्रशासनाने अनुपालन करून अहवाल सादर करावा. त्यावर विचार विनिमय करण्यात येईल असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.१६८ :**

सन २००१-२००२ च्या लेखा परीक्षण अहवालावर विचार विनिमय करणे.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सन २००१-२००२ च्या लेखा परीक्षण अहवालातील आक्षेपांची पुर्तता करण्याकरीता प्रशासनास २८ फेब्रुवारी पर्यंत मुदत देण्यात येते. प्रशासनाने अनुपालन करून अहवाल सादर करावा. त्यावर विचार विनिमय करण्यात येईल असे सर्वानुमते ठरले.

**संवाद :**

श्री.कवरसिंग बैनाडे : बाहेरील वाहनामधे महानगरपालिकेच्या पेट्रोल पंपावरून डिजेल भरून जत असेल हे आजनिदर्शनास आलेले आहे अशा किती गाडयामधे डिजेल भरून जते याची माहिती दयावी.संबधीत अधिकारी यांचे वर काय कार्यवाही करणार आहे.

मा.सभापती : अति.शहर अभियंता यांनी खूलासा करावा.

अति.शहर अभियंता : या संदर्भात या विभागातील अधिकारी यांना तेथे जईपर्यत त्या पेट्रोल पंपावर रिडींगला सिल करण्यास सांगितलेले होते.तसेच गाडी कोणती उभी आहे त्याची पण चौकशी करण्यास सांगितलेले होते. वर्कशॉपला एमएच २० ई ९७९६ ही गाडी उभी होती. ही जीप बिहारीलाल म्हणून वाहन चालक आहे त्यांनी एक वाजता गाडी वर्कशॉपला लावलेली होती. दुपारी २.०० वाजता संबधीत कर्मचारी याची मालमत्ता विभागात डयुटी होती त्यामूळे सदर कर्मचारी हे २.०० वाजेच्या सुमारात गाडी घेवून गेलेले आहे. सकाळी १०.०० वाजेपासूनची रिडींग व जेंव्हा सिले केले त्यावेळची रिडींग यामधील फरक हा ९७३ लिटरचा होता. लॉगबूक प्रमाणे ९७३ लिटर डिजेल वाटप झालेले होते. आणखी चौकशी केली असता बाजूला एक व्यक्ती उभे होत त्यांना विचारणा केली असता एक ते दोन लिटर डिजेल बाहेरील गाडीत भरीत असतात असे तो म्हणाला प्रत्यक्षात त्यांनी डिजेल भरतांना बघीतलेले नव्हते. परंतू बाहेरील गाडी तेथे वर्कशॉपला उभी करणे योग्य नाही. डिझेल भरले नाही.

श्री.मुजेब खॉन : मला जेंव्हा फोन वरून कळविले त्यावेळी तेथै एक व्यक्ती होते त्यांनी असे म्हटले होते. जेंव्हा तेथे अधिकारी गेले तेंव्हा संबधीत व्यक्ती तेथे होते प्रशासनाच्या निर्दशनास आणून देण्याचे काम माझे होते ते केलेले आहे.

मा.सभापती : अधिकारी यांना खुलासा केला की मालमत्ता अधिकारी यांचे गाडीवर जेवाहन चालक होते त्यांनी तेथे गाडी लावलेली होती.यांत्रिकी विभागात डिजेल भरण्या संदर्भात शंकास्पद काही घटना घडलेली आहे. कोणतेही वाहन जत असतांना तेथे इन्ट्री असते. ज्या वाहनाचे काम महानगरपालिकशी संबधीत येत नाही अशा वाहनास तेथे प्रवेश नसतो. तर मधे गेलेली गाडी कुणाच्या परवानगीने मधे गेलेली होती. कशासाठी व कुणाच्या मालकीची होती याची संपूर्ण चौकशी ज्यांनी अधिकृत माहिती दिलेली आहे त्या व्यक्तीकडूनही माहिती घेवून जेदोषी असतील त्यांचेवर कार्यवाही करावी.

‘राष्ट्रगिता’नंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद